शासकीय व निम-शासकीय सेवेत आरक्षित पदांवर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची तत्परतेने करावयाची नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
परिपत्रक क्रमांक:बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२१/८९/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ५ फेब्रुवारी, १९९१.

वाचा : (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२१/८९/१६-ब, दिनांक १२ जुलै, १९८९.

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२१/८९/१६-ब, दिनांक ११ ऑगस्ट, १९८९.

शासन परिपत्रक :- वरील शासकीय परिपत्रकान्वये शासकीय व निम-शासकीय सेवेतील मागासवर्गीयांचा तत्कालीन भरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी खास प्रयत्न करण्याबाबतचे आदेश शासनाने सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांना दिले आहेत. शासनाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे की, अनुसूचित जमातीचा आरक्षित जागांचा अनुशेष भरण्यासाठी त्या पदांचे उमेदवार विविध नियुक्ती अधिकाऱ्यांना पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. या प्रश्नाचा विचार करून शासन असे आदेश देत आहे की, अनुसूचित जमातीचे उमेदवार विविध जाहीर पदांसाठी तत्परतेने उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सर्व नियुक्ती अधिकाऱ्यांनी, अनुशेष तसेच चालू आरक्षण याबाबत राज्य निवड मंडळ/प्रादेशिक निवड मंडळे, इ. ठिकाणी मागणीपत्र पाठविताना त्या मागणीपत्राची प्रत अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास नाशिक/नागपूर तसेच संचालक, आदिवासी विकास, नाशिक यांना न चुकता पाठवावी म्हणजे सदर अधिकारी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना जाहीर पदांसंदर्भात अर्ज करण्यासाठी तत्परतेने मार्गदर्शन करतील. हीच पद्धत प्रादेशिक निवड मंडळाच्या कक्षेबाहेरील पदे जाहीर करण्यासाठीही अंमलात आणावी.

२. तसेच, रिक्त पदे भरण्यासाठी मागणीपत्रे निवड मंडळाकडे पाठविताना, अशा मागणीपत्रात अनुसूचित जमातीचा अनुशेष आणि/अथवा चालू आरक्षणासाठीची पदे भरावी नसली तरीही त्या मागणीपत्राच्या प्रती वर म्हटल्या प्रमाणे अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, इत्यादींना पाठवाव्यात.

३. त्याच प्रमाणे निवड मंडळांनीही त्यांनी रिक्त पदे भरण्यासाठी दिलेल्या जाहिरातीच्या प्रती अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर, तसेच संचालक, आदिवासी विकास, नाशिक यांना न चुकता पाठवाव्यात.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
16 MAR 1991

पु.मा.प.

4660

७. शासन असेही आदेश देत आहे की, तात्पुरती व्यवस्था म्हणून अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची आरक्षित पदे जी तातडीने भरावयाची असतात त्याबाबत नियुक्ती अधिकाऱ्यांनी मागणीपत्र अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर आणि संचालक, आदिवासी विकास, नाशिक यांच्याकडे किमान २० दिवस आधी पाठवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पु. द. माळवे,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
मंत्री आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सचिव, आदिवासी विकास विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सचिव, सर्व प्रादेशिक निवड मंडळे,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
संचालक, सेवायोजन, नवी मुंबई,
संचालक, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर,
सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
कार्यासन १२-अ, सामान्य प्रशासन विभाग.

एप-११६०( ३०००-२-९१ )